बांधकाम कामगारांची ग्रामीण व शहरी भागात सहजतेने, तत्परतेने व गतीने नोंदणी व्हावी यासाठी "नोंदणी अधिकारी" घोषित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्रमांक : इबांका २०१७/प्र.क्र.३६९/कामगार-७
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०२ जानेवारी, २०१८

वाचा - १) इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ चे कलम १२ (२) व महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ मधील नियम ४६
२) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन परिपत्रक दि.१३.१०.२०१३
३) कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, यांचे क्र.मइवइबाकमं/नोंदणी अधिकारी/२०१७/ १८५ ते १८६ दिनांक २० सप्टेंबर २०१७ व क्र.मइवइबाकमं/नोंदणी अधिकारी/२०१७/२१६ दिनांक १३ ऑक्टोबर २०१७ चे पत्र.

**प्रस्तावना-**

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम,१९९६ मधील कलम १२ (२) मध्ये बांधकाम कामगारांच्या नोंदणीसाठी नोंदणी अधिकारी म्हणुन प्राधिकृत करण्याचे अधिकार महाराष्ट्र इमारत व इतर कामगार कल्याणकारी मंडळास आहेत. तथापि कामगार आयुक्त यांनी संदर्भाधीन क्रमांक ०३ येथील दिनांक २० सप्टेंबर व १३ ऑक्टोबर २०१७ च्या पत्रान्वये शासनाच्या विविध विभागातील अधिका-यांची नोंदणी अधिकारी म्हणून शासनस्तरावरुन अधिसूचित होणे योग्य असल्याचे कळविले आहे. यास्तव महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम,२००७ मधील नियम ४६ मधील तरतूदीनुसार बांधकाम कामगारांची जास्तीत जास्त नोंदणी करुन त्यांना ओळखपत्र देण्यासाठी ग्रामीण भागात गटविकास अधिकारी, पंचायत समिती, तसेच शहरी भागाकरिता मुख्याधिकारी, नगरपरिषद व वॉर्ड ऑफीसर, महानगरपालिका तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग आणि जलसंपदा विभागातील सर्व उप अभियंता यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात असलेल्या बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यासाठी नोंदणी अधिकारी म्हणुन प्राधिकृत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

बांधकाम कामगारांची ग्रामीण व शहरी भागात सहजतेने, तत्परतेने व गतीने नोंदणी व्हावी या साठी खालील तक्त्यामध्ये दिलेल्या अधिकाऱ्यांना बांधकाम कामगार नोंदणीसाठी "नोंदणी अधिकारी" म्हणून घोषित करीत आहे. त्यानुसार खालील अधिकाऱ्यांनी अधिनियमाच्या तरतूदी नुसार बांधकाम कामगारांच्या नोंदणीची जबाबदारी पार पाडावी. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, व सचिव महाराष्ट्र इमारत व इतर कामगार कल्याणकारी मंडळाने त्यांना या संदर्भात मार्गदर्शन करावे.



Scanned with CamScanner